# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती
# सभावृत्तांत कार्यपत्रिका क्रमांक १०

दिनांक : १३/१/२०१६ वेळ : दुपारी १२.०० वा.

-----------------------------------------------------------------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जानेवारी ची मासिक सभा बुधवार दिनांक १३/१/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजतां अ क्षेत्रीय कार्यालयातील " राजमाता जिजाऊ सभागृह " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

१. मा. काळभोर वैशाली जालिंदर – सभापती
२. मा. भारती फरांदे
३. मा. जावेद शेख
४. मा. सुभद्रा ठोंबरे
५. मा. प्रतिभा भालेराव
६. मा. पांढरकर निलेश
७. मा. झांबरे सतिश (स्विकृत सदस्य)
८. मा. कुटे गिरीष (स्विकृत सदस्य)
९. मा. भोंडवे बेबीनंदा (स्विकृत सदस्या)

याशिवाय श्री. प्रशांत खांडकेकर -क्षेत्रीय अधिकारी, श्री. फारुक शेख, कार्यकारी अभियंता,स्थापत्य, श्री. मिलींद कपिले- कार्यकारी अभियंता विद्युत, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री.सुनिल वाघुंडे, श्री.अनिल शिंदे , श्री. संजय भोसले , श्री. बन्सल एच.पी. उपअभियंता स्थापत्य, श्रीम.लता बाबर - उपअभियंता विद्युत, श्रीमती. मोमीन, उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री. प्रदीप पुजारी, उपअभियंता ,झोनिपु- स्थापत्य, श्री. शिंदे एच.एस. उपअभियंता, जलनि:स्सारण, श्री. भागवानी सुनिल, उपअभियता, नगररचना, श्री. विजय भोजने, उपअभियंता, स्थापत्य-बी.आर.टी.एस. श्री.पांडुरंग जाधव, लेखाधिकारी, श्री.एम.एम.शिंदे - सहा. आरोग्याधिकारी, श्री. लवटे सुशिलकुमार, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, श्री. फाटक जे.डी. कनिष्ठ अभियंता, नगररचना व श्री.बी.पी.आढारी, सहा.पो. फौजदार, वाहतुक शाखा उपस्थित होते.

मा. सभापती यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

मा. सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १ : मा. चारुशिला प्रभाकर कुटे यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.
प्रभाग क्रमांक १५ मधील अ क्षेत्रिय सभेत आजवर झालेल्या ठरावाची अंमलबजावणी करुन त्या ठरावात झालेल्या नामकरणाच्या पाटया लवकरात लवकर लावणे बाबत.

विषय क्रमांक २ : मा. चारुशिला प्रभाकर कुटे यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.
प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील रस्त्याचे नामकरण ठराव करणेबाबत.

विषय क्रमांक ३ : चारुशिला प्रभाकर कुटे यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.
कलम २०५ अंतर्गत रस्ता विकास आराखडयामध्ये घेणेबाबत ठराव करणे.
प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील मोजे विठ्ठलवाडी, स.नं. ३७४ शंकर मंदिर ते कुटे वृंदावन सो. अंतर्गत असणा-या रस्त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये सदर रस्ता ६ मीटर पर्यंत करुन सदर रस्ता विकास आराखडयामध्ये सामिल करुन घेणेबाबत.

विषय क्रमांक ४ : मा. निलेश शंकरराव पांढरकर यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.
आकुर्डी परिसरातील पांढरकर वस्ती येथील डॉ. सोनल जाधव क्लिनीक शेजारील चौकास छत्रपती संभाजी महाराज चौक , पांढरकर वस्ती, आकुर्डी, पुणे
- ३५ असे नामकरण करणेबाबत.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक : ४८ | विषय क्रमांक : १ |
| दिनांक : १३/१/२०१६ | विभाग : स्थापत्य |
| सूचक : मा. जावेद शेख | अनुमोदक : मा. निलेश पांढरकर |

संदर्भ : मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ.सो.

समोरील ६.०० मीटर रुंद रस्त्यास “हस्तीमल शेठ गादिया मार्ग” असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक १०/२/२०१६ रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : ४९ विषय क्रमांक : २
दिनांक : १३/१/२०१६ विभाग : स्थापत्य
सूचक :मा. प्रतिभा भालेराव अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. १५/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ किवळे (मुकाई चौक) मधील बस टर्मिनलचे “ मुकाई बस टर्मिनल ” असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

(दिनांक १०/२/२०१६ रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

**ठराव क्रमांक : ५०** **विषय क्रमांक : ३**
दिनांक : १३/१/२०१६ विभाग : नगररचना
सूचक : मा. निलेश पांढरकर अनुमोदक : मा. प्रतिभा भालेराव
संदर्भ : मा. निलेश शंकरराव पांढकर यांचा दि. २/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे आकुर्डी मंजूर विकास योजना आराखडयात स.नं. १७९ पैकी मध्ये आरक्षण क्रमांक २७३ हे प्राथमिक शाळा हे आरक्षण असून सदर

आरक्षणातील क्षेत्रामध्ये सुमारे ४०० कुटुंबे राहतात. या आरक्षणामधील जागेत आरक्षण मंजूर होण्या अगोदर पासून घरे आहेत. तसेच या आरक्षणाच्या आजूबाजूला म्हणजेच अर्धा ते एक किलोमीटर अंतरावर १३ ते १४ शाळा आहेत व महानगरपालिकेचे श्री. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय हे या प्रभागात आहे. त्यामुळे मंजूर विकास योजनेतील स.नं. १७९ पैकी मधील आरक्षण क्र. २७३ ची आवश्यकता नाही. म्हणून मंजूर विकास योजनेतील स.नं. १७९ पैकी मधील आरक्षण क्रमांक २७३ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन सदर आरक्षणातील क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेकामी मा. शहर सुधारणा समिती मार्फत मा. महानगरपालिका सभेकडे शिफारस करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

**ठराव क्रमांक : ५१** **विषय क्रमांक : ४**

दिनांक : १३/१/२०१६ विभाग : स्थापत्य

सूचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा. संगिता भोंडवे यांचा दि. ९/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

शुभारंभ कॉलनी, स.नं. (१३१/२ व १३०/१ मधील) यास शुभारंभ कॉलनी असा नामफलक बसवून मिळणेबाबत मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक १० /२/२०१६ रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**ठराव क्रमांक : ५२** **विषय क्रमांक : ५**

दिनांक : १३/१/२०१६ विभाग : स्थापत्य-बीआरटीएस

सूचक : मा.जावेद शेख अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा. आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील प्रस्ताव क्र. स्थापत्य / बीआरटीएस /३५५/२०१५, दि. ७/११/२०१५

रेल्वे उड्डाणपुल ते भक्ती शक्ती चौकापर्यत ४५ मीटर रस्ता विकसीत करणे ( नि. नो.क्र. १०/१-२०१४/१५० या कामाच्या रस्ता रुंदीमधील चैनेज ५१०० येथील लोक शाहीर आण्णाभाऊ साठे पुतळा स्थलांतरीत करणे तसेच महानगरपालिकेचे कारंजे पाडण्यास मा. अ प्रभाग समितीची मंजुरी घेणे बाबत.

निगडी येथील भक्ती शक्ती चौक ते द्रुतगती मार्गाजवळील किवळे मुकाई चौकापर्यंत ४५ मीटर बीआरटीएस रस्ता विकसीत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. याकामा अंतर्गत किवळे येथील मुकाई चौक ते रेल्वे उड्डाण पुल पर्यत ४५ मीटर रस्ता, रेल्वे लाईनवर उड्डाण पुल ( ROB) बांधणे व रेल्वे उड्डाणपुल ते भक्ती शक्ती चौक निगडी पर्यंतचा ४५ मीटर रुंदीचा रस्ता विकसीत करणे अशा एकुण तीन टप्यांचा समावेश आहे.

रेल्वे उड्डाणपुल ते भक्ती शक्ती चौक निगडी पर्यंतचा ४५ मीटर रस्ता रुंदीने भक्ती शक्ती निगडी चौक चैनेज ५१०० येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुतळा व उद्यान तसेच चैनेज ५२०० येथे महानगरपालिकेचे कारंजे बाधित होत आहे. अवलोकनार्थ रस्त्याचा नकाशा सोबत जोडला आहे. रस्ता रुंदीतील लोक शाहीर आण्णाभाऊ साठे पुतळा निगडी येथील बसटर्मिनस लगत स्थलांतरीत करण्यासाठी कार्यकारी अभियंता स्थापत्य फ क्षेत्रीय कार्यालया मार्फत कार्यवाही करणेत येत आहे. कारंजे व उद्यान पाडणेस मंजुरी मिळणेकामी मा. अ प्रभाग समितीपुढे विषयपत्र ठेवणेस प्रस्ताव सादर करणेत येत आहे. रस्ता रुंदीतील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा महापालिकेच्या धोरणाप्रमाणे स्थापत्य फ क्षेत्रीय कार्यालयामार्फत नेहरुनगर येथील मध्यवर्ती भांडारामध्ये सुरक्षित ठेवण्यात येईल.

सदर प्रस्तावास मा. आयुक्त सो. पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दि. ५/११/२०१५ चे कार्यालयीन टिपणीनुसार मंजुरी दिली आहे. रस्ता रुंदीने बाधित लोक शाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा स्थलांतरीत करणे बाबत आवश्यक ती कार्यवाही करणे बाबत कार्यकारी अभियंता फ क्षेत्रीय कार्यालय यांना स्थापत्य बीआरटीएस विभागामार्फत कळविण्यात येईल. कांरजे ( Fountain) पाडणेस मा. अ प्रभाग समितीच्या मंजुरीसाठी विषय पत्र सादर करणेत येत आहे. तरी रेल्वे उड्डाणपुल ते भक्ती शक्ती

चौकापर्यंतच्या ४५ मीटर रस्ता रुंदीमधील चैनेज ५२०० निगडी येथील महानगरपालिकेचे कारंजे ( Fountain) पाडणेबाबत अ प्रभाग समितीच्या बैठकीमध्ये मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

**ठराव क्रमांक : ५३** **विषय क्रमांक : ६**

दिनांक : १३/१/२०१६ विभाग :अक्षेत्रीय कार्यालय – प्रशासन

सूचक : मा.जावेद शेख अनुमोदक : मा निलेश पांढरकर

संदर्भ : अ क्षेत्रीय कार्यालयाचा दि. २/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

सन २०१५-२०१६ चे सुधारित व सन २०१६ -२०१७ चे मूळ अंदाजपत्रक छपाईकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.

अ क्षेत्रीय कार्यालयाचे सन २०१५-२०१६ चे सुधारित व सन २०१६-२०१७ चे मूळ अंदाजपत्रक तयार करुन प्रभाग समिती पुढे सादर करावयाचे आहे. त्याकामी अंदाजे १५० पानांचे एक या प्रमाणे ४० अंदाजपत्रक पुस्तकांच्या प्रतीची छपाई करणे आवश्यक असून त्यासाठी अंदाजे रु.४०,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदर अंदाजपत्रक पुस्तकांची तातडीची बाब म्हणून कोटेशन पध्दतीने दर मागवून करारनामा न करता छपाई करुन घेणेस मान्यता देणेबाबत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**ठराव क्रमांक : ५४** **विषय क्रमांक : ७**

दिनांक : १३/१/२०१६ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. जावेद शेख अनुमोदक : मा. प्रतिभा भालेराव

संदर्भ : मा. चारुशीला कुटे यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १५ मधील अ क्षेत्रीय सभेत आजवर झालेल्या ठरावाची अंमलबजावणी करुन

त्या ठरावात झालेल्या नामकरणाच्या पाटया लवकरात लवकर लावण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

. सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**ठराव क्रमांक : ५५** **विषय क्रमांक : ८**

दिनांक : १३/१/२०१६ विभाग :स्थापत्य

सूचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.जावेद शेख

संदर्भ : मा. चारुशीला कुटे यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील नाना स्मृती मंगल कार्यालया मागील लक्ष्मी प्रोव्हीजन स्टोअर पासून ते चर्च पर्यंतच्या रस्त्याला " कै. गणपतराव ज्ञानदेव चव्हाण " तसेच उत्कर्ष क्लासेस ते सेंट्रल बँक या अंतर्गत रस्त्याला " कै. चंपालाल जैन मार्ग " तसेच विठ्ठल मंदिराच्या डाव्या बाजूने श्रीकृष्णनगर पर्यंत जाणा-या रस्त्यास " कै. संपत उमाजी माने मार्ग " व शंकर मंदिर ते कुटे वृंदावन सो. अंतर्गत असणा-या रस्त्याला " कै. बाळासाहेब रंगनाथ जाधव मार्ग " , आदर्श मित्र मंडळ समोरील रस्त्यास " कै. ह. भ. प. चांगदेव दादा काकडे " आणि विघ्नहर गणेश मंदिर ते दक्षिण मुखी मारुती मंदिर अंतर्गत रस्त्यास " कै. सुषमाताई विनायक जोशी मार्ग " असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक १० /२/२०१६ रोजीचे सभेमध्ये घेणेच्या निर्णयाप्रमाणे)

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--

ठराव क्रमांक : ५६ विषय क्रमांक : ९

दिनांक : १३/१/२०१६ विभाग : नगररचना

सूचक : मा. वैशाली काळभोर अनुमोदक : मा.जावेद शेख

संदर्भ : मा. चारुशीला कुटे यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील मौजे विठ्ठलवाडी मधील स.नं. ३७४ , शंकर मंदिर

ते कुटे वृंदावन सो. अंतर्गत असणा-या रस्त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये सदर रस्ता ६ मीटर पर्यंत करुन सदर रस्ता विकास आराखडयामध्ये सामील करुन घेणेबाबत मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदरचा विषय दप्तरी दाखल करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक : ५७ विषय क्रमांक : १०

दिनांक : १३/१/२०१६ विषय : स्थापत्य

सूचक : मा. निलेश पांढरकर अनुमोदक : मा. प्रतिभा भालेराव

संदर्भ : मा. निलेश पांढरकर यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

आकुर्डी परिसरातील पांढरकर वस्ती येथील डॉ. सोनल जाधव यांच्या क्लिनीक शेजारील चौकास " छत्रपती संभाजी महाराज चौक, पांढरकर वस्ती, आकुर्डी, पुणे-३५ " असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(सौ.वैशाली जालिंदर काळभोर)
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /११/कावि/ ३८/२०१६
दिनांक : ८/२/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती